I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** फौजदार चावडी **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0345 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/05/2025 01:03 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 16/05/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/05/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:26 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:31 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 20/05/2025 **Time (वेळ):** 23:15 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 21/05/2025 01:03 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 3 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जुनी मिल महावितरण कार्यालयाचे, एसब डिव्हीजन कार्यालयात , सोलापुर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विस्मय कैलाश उपाध्ये

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 6/5 बि न16, पंधे अपार्टमेंट, , स्वामी समर्थ सोसायटी, , सोलापूर, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 6/5 बि न16, पंधे अपार्टमेंट, , स्वामी समर्थ सोसायटी, , सोलापूर, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9112222068

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | भारत पांडूरंग व्हनमाने | | | 1. नेम- महावितरण कार्यालय,ए-सबडिव्हिजन, Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): फौजदार चावडी,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्वाती सदानंद सलगर | | | 1. बी-1अभिषेक नगर,जुळे सोलापूर,Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | योगीनाथ भैरप्पा म्हेत्रे | | | 1. मु पो हत्तूर,ता दक्षिण सोलापूर,Town/Village (शहर / गाव): जि सोलापुर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एकूण 8000/ रू लाच रक्कम | 8,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 8,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.20.05.2025

मी विस्मय कैलाश उपाध्ये, वय- 33 वर्षे, व्यवसाय – सोलार पाँवर प्लाँन्ट, रा. फ्लँट नं. 6/5, बिल्डींग नं. 16, स्वामी समर्थ सोसायटी, पंधे अपार्टमेंट, सोलापूर मो.नं. 9112222068 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, मी सन 2018 पासून सोलार पावर सिस्टीम बसविण्याचे काम करत आहे. मी सौर ऊर्जा उत्पादने व विक्री सेवा बाबतचा फ्युचर एनर्जी सोल्युशन्स नावाने शाँपअँक्ट लायसन्स क्र.183100312207455 नुसार दि.20/02/2018 अन्वये नोंदणी परवाना प्राप्त आहे. फ्युचर एनर्जी सोल्युशन मार्फत ज्या ग्राहकांना घरगुती अथवा दुकाने किंवा कमर्शिअल स्वरुपात सोलार प्लाँन्ट बसवायचे आहेत, त्याठिकाणी त्यांच्या गरजेप्रमाणे किलो व्हँट क्षमतेनुसार सोलार यंत्रणा बसवून ती कायान्वित करुन देण्याची कामे मी व्हेन्डर म्हणून करतो. सदरबाबत मी महावितरणच्या रुप टाँप सोलर (आरटीएस) पोर्टल व पीएम सुर्यघर पोर्टलवर आँनलाईन पध्दतीने माझ्या फर्मची कागदपत्रे अपलोड करुन, रजिस्टर केले होते. त्यानंतर त्यांच्याकडून मला लाँगिंन आयडी व पासवर्ड मिळाला असून, अशाप्रकारे मी महावितरण कंपनीचा अधिकृत वेंडर झालेलो आहे.

मी व्हेंडर म्हणून काम करताना माझ्याकडे दोन प्रकारचे सोलार प्लाँन्ट, त्यामध्ये प्रथम सबसिडी (अनुदानित) व विना अनुदानित अशा दोन प्रकारची सोलार यंत्रणा बसविण्याचे काम करतो. ग्राहकांच्या मागणीप्रमाणे अनुदानित अथवा विनाअनुदानित सोलार यंत्रणा बसवून त्याचे आँनलाईन प्रणालीद्वारे ग्राहकांच्या नावाने पीएम सुर्यघर व महावितरण या दोन्ही पोर्टलवर नोंदणी करुन पुढील कार्यवाहीसाठी महावितरण कार्यालयातून तपासणी, मंजूरी व त्यानंतर मीटर बसविण्याचे काम पाहतो. अनुदानित सोलार प्लाँन्टकरीता पीएम सुर्र्यघर व महावितरण या दोन्ही पोर्टलवर नोंदणी करावी लागते. पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर, तपासणीसाठी व मंजूरीसाठी महावितरण कार्यालयात पाठविल्यानंतर त्यास मंजूरी मिळाल्यास ऑनलाईन पोर्टलवर दिसते परंतु विनाअनुदानित सोलार प्लाँन्टसाठी महावितरणाच्या पोर्टलवर प्रथम ग्राहकांच्या नावे अर्ज भरल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट

काढून संबंधीत ठिकाणाच्या महावितरण कार्यालयातील अधिकारी यांची स्वाक्षरी झाल्यावर सदरचे अर्ज पुढील प्रक्रियेसाठी ऑनलाईन पोर्टलवर अपलोड केले जाते, त्यानंतर पुढील कार्यवाही झाल्यावर महावितरण कार्यालयाकडून मंजूरी मिळाल्यावर मीटर बसविण्याचे काम केले जाते.

सोलापूर शहरात माझे सध्या 15 ते 20 सोलार प्लॉन्ट कनेक्शनची कामे चालू असून त्यापैकी 1) श्री हर्षवर्धन मोतीचंद शहा यांच्या घरी अनुदानित 3.4 किलो वॅट क्षमतेचे सोलार प्लान्ट बसवण्यात आले असून त्याची मंजूरी मिळून मीटर बसवून मिळणेकरीता महावितरणाच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केला आहे, त्याचा ग्राहक क्रं.330240555727 असा आहे. 2) जगन्नाथ बी विंग हरीपदम रेसीडेन्सी अपार्टमेंट येथे विना-अनुदानित 10 किलोवॅट क्षमतेचा सोलार प्लान्ट बसवण्यात आले असून त्याची मंजूरी मिळून मीटर बसवण्यासाठी अर्ज केला असून त्याचा ग्राहक क्र.330242008782 असा आहे व 3) श्री विरल देसाई यांच्या दुकानाचे विना अनुदानित 3 किलोवॅट क्षमतेसाठी सोलार प्लॉन्ट बसवण्यात आले असून त्याचा ग्राहक अर्ज क्र.330241426106 प्रमाणे ऑनलाईन अर्ज भरुन त्याची प्रिंट काढून त्यावर महावितरण अधिका-याच्या स्वाक्षरीसाठी ए सब डिव्हीजन, महावितरण कार्यालयात सादर केले आहेत. सदर अर्जाची छायांकित प्रत मी माझ्याकडे ठेवलेली नाहीत. सदर ग्राहकांची नावे ऑनलाईन प्रणालीत वरील नमुद अर्ज क्रमांक दिसत असून सदर अर्जाचा तपशील दिसून येत नाहीत परंतु श्री हर्षवर्धन मोतीचंद शहा यांच्या घरी अनुदानित सोलार प्लान्ट बसवून त्यांच्या नावाने महावितरणाच्या पोर्टलवर 3.4 किलो वॅट क्षमतेचे मीटरची आवश्यकतेप्रमाणे ऑनलाईन अर्ज व त्यावर करण्यात आलेली कार्यवाही पोर्टलवर उपलब्ध असल्याने सदर ग्राहकाच्या अर्जाची प्रत प्रिंट काढून सादर करत आहे. त्यामुळे वरील तिन्ही कामांचे महावितरण कार्यालयातून मंजूरी मिळवून मीटर बसविण्यासाठी मी व आमचे सुपरवायझर म्हणून काम पाहणारे श्री अबुझर सादिक शेख वेळोवेळी पाठपुरावा करत होतो.

दि.15/05/2025 रोजी आमचे सुपरवायझर श्री अबुझर सादिक शेख हे 1) श्री हर्षवर्धन मोतीचंद शहा यांचे 3.4 किलोवॅट क्षमतेचे अनुदानित ग्राहक अर्ज क्रं.330240555727 2) जगन्नाथ बी विंग हरीपदम रेसीडेन्सी अपार्टमेंट येथे 10 किलोवॅट क्षमतेचे विना-अनुदानित ग्राहक अर्ज क्र.330242008782 व 3) श्री विरल देसाई यांच्या दुकानाचे विनाअनुदानित 3 किलोवॅट क्षमतेचे ग्राहक अर्ज क्र.330241426106 या सोलार प्लॉन्टच्या मंजूरीबाबत विचारणा करण्यासाठी जुनी मिल येथील महावितरण कार्यालयाचे ए सब डिव्हीजन कार्यालयात जावून सदर कार्यालयातील श्री योगीनाथ म्हेत्रे यांना भेटले असता त्यांनी 1) श्री हर्षवर्धन मोतीचंद शहा यांचे अनुदानित ग्राहक अर्ज क्रं.330240555727 2) जगन्नाथ बी विंग हरीपदम रेसीडेन्सी अपार्टमेंट येथे विना अनुदानित 10 किलोवॅट क्षमतेसाठी ग्राहक अर्ज क्र.330242008782 च्या तपासणीच्या अनुषंगाने सदर स्थळांची पाहणी केली असल्याचे सांगून तिन्ही कामाचे मंजूरी देवून मीटर बसविण्यासाठी श्री व्हनमाने, अतिरीक्त कार्यकारी अभियंता व एईक्युसी मॅडम, सहायक अभियंता गुणवत्ता नियंत्रण (नाव माहित नाही) यांच्यासाठी प्रति किलोवॅट रु.1000/- प्रमाणे रु.16000/- दयावे लागतील, त्यानंतर तुमचे काम करण्यात येईल असे सांगितले. त्यावेळी माझे सुपरवायझर अबुझर शेख याने आमच्या सरांना विचारुन सांगतो असे बोलुन निघून आले व सदरबाबतची हकिकत मला सांगितली.

त्यानंतर दि.16/05/2025 रोजी मी सकाळी 11.55 वा. महावितरण कार्यालयातील श्री योगीनाथ म्हेत्रे यांना त्यांचे मो क्र.9604289312 यावर कॉल करुन वर नमुद कामाबाबत विचारणा केली असता

त्यांनी मला सुपरवायझर अबुझर शेख यांना सांगितलेप्रमाणे श्री व्हनमाने, अतिरीक्त कार्यकारी अभियंता व एईक्युसी मॅडम, सहायक अभियंता गुणवत्ता नियंत्रण यांच्यासाठी तिन्ही कामाचे प्रती किलोवॅट रु.1000/- प्रमाणे 16 किलोवॅटचे एकूण रु.16000/- दयावे लागतील तरच आम्ही रिलीज ऑर्डर, मंजूरी देवू असे सांगितले.

सदर कामासाठी महावितरण कार्यालयाकडून कोणतीही फि आकारण्यात येत नसून महावितरण कार्यालयातील श्री योगीनाथ म्हेत्रे हे लाच मागणी करीत असल्याची खात्री झाल्याने मी दि.16/05/2025 रोजी सुपरवायझर अबुझर शेख यांच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे जाऊन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांना भेटून माझी तक्रार सांगितली.

त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी सोलापूर महानगरपालिकेकडून दोन शासकीय पंच बोलावून घेतले त्यांनतर मी माझी तक्रार पंचासमक्ष कथन करुन लेखी तक्रार दिली. सदर लेखी तक्रारीवर पोनि पिंगुवाले व दोन्ही पंचानी वाचून सहया केल्या. त्यानंतर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि.पिंगुवाले यांनी मला श्री योगीनाथ म्हेत्रे, श्री व्हनमाने, अतिरीक्त कार्यकारी अभियंता व एईक्युसी मॅडम, सहायक अभियंता गुणवत्ता नियंत्रण यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, मी त्यांना ते महावितरण कार्यालयाचे ए सब डिव्हीजन कार्यालय, जुनी मिल कंपाऊन्ड येथे भेटतील असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये यापुर्वी कोणतेही रेकॉर्डींग नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर मला व पंच क्र.1 बनसोडे यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन ते माझ्या गळयात अडकावून मला श्री योगीनाथ म्हेत्रे, श्री व्हनमाने व एईक्युसी मॅडम, सहायक अभियंता गुणवत्ता नियंत्रण यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 यांच्यासह माझे सुझुकि कंपनीची एक्सेस मॉडेलची मोटार सायकल क्र. एमएच 13 डीडब्ल्यु 5121 यावरुन 16.25 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे जुनी मिल येथील महावितरण कार्यालयात गेलो असता, सदर ठिकाणी म्हेत्रे साहेब हे तिथे दिसून न आल्याने मी त्यांना माझे मोबाईल क्र.9112222068 वरुन म्हेत्रे यांचा मोबाईल क्र.9604289312 यावर कॉल करुन मोबाईल स्पिकरवर ठेवून बोललो असता त्यांनी युनिक हॉस्पिटलचे रिडींग घेत असल्याचे सांगून पाच मिनिटात ऑफिसमध्ये येतो असे सांगितले. त्यामुळे आम्ही त्यांची वाट पाहत कार्यालयाच्या बाहेर कॅन्टीनजवळ थांबलो. थोडयावेळाने म्हेत्रे साहेब कार्यालयात आल्यावर आम्ही त्यांची भेट घेऊन कामाबाबत चर्चा केली, चर्चेदरम्यान म्हेत्रे यांनी ते भैयासमोर बोललो वाटल्यास.. आता साहेब येतेत साहेबांशी भेटून घ्या असे बोलून लाच रक्कमेबाबत माझे सुपरवायझर अबुझर शेख यांना सांगितले असल्याचे बोलले, त्यावेळी मी त्यांना साहेब त्यानी माहिती हाय त्यानी सांगितल.. थाऊजंड रूपीज पर किलोव्हॅट म्हणून.. सर लई होतय.. सर तस काय तरी थोड कमी करा. काय असेल तुम्हाला स्पष्ट सांगतो असे बोलून प्रती किलोवॅट रु.1000/- जास्त असल्याचे सांगितले. त्यावेळी आमच्यामध्ये शहांच्या कामाबाबत चर्चा झाली, त्यानंतर म्हेत्रे यांनी मॅडम बसले नाहीतर झाल असत.. आता हे त्यानी काढूनच ठेवतेत आल की.. दोन करा मी सांगतो काय तरी दोन करा असे म्हणुन 2000/- रु. लाचेची मागणी केली, त्यावेळी मी त्यांना शहा आणि हरिपदम दोन्ही म्हणताय का शहाच म्हणताय असे विचाले असता त्यांनी फक्त शहाच असे सांगितले.

त्यानंतर पुढे चर्चेदरम्यान म्हेत्रे यांनी मॅडम पण येतेत मॅडमला सांगा..मी काय करणार मॅडमना हजार त्यांच हजार अस करणार..माझं कायच नाही..त्यांनी दिलतर घेतो नायतर..पुढचे कस्टमर असे बोलून दोन हजार लाच रकमेतील एक हजार रुपये मॅडम व एक हजार रुपये साहेबांकरीता असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना लाच रकक्म कमी करण्याबाबत सरांशी बोलू का असे विचारणा केली असता त्यांनी बोलून घ्या असे सांगितले. थोडयावेळाने श्री व्हनमाने साहेब आल्यावर त्यांच्या केबीनमध्ये जावून भेट घेतली, त्यावेळी मी माझी ओळख सांगून कामाबाबत चर्चा केली, चर्चेदरम्यान म्हेत्रे देखील केबीनमध्ये आले त्यावेळी माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली त्यानंतर म्हेत्रे बाहेर निघून गेले, चर्चेदरम्यान व्हनमाने साहबांनी तुमच्या डोक्यात काय किती करणार हाय.. त्यानी काय हजार रुपये सांगितल असेल 3 के डब्ल्युला.. किती सांगितलय? असे विचारले. त्यावेळी मी त्यांना त्यानी तीन किलो वॅटला तीन हजार रुपये म्हणलेत सर.. एका प्रोजेक्टला हजार रुपये प्रॅक्टीकल आहे सर..म्हणजे तीन प्रोजेक्टला असे तीन हजार त्यावेळी त्यांनी मी लय.. एक हजार रुपयेच घेतो तीन किलोवॅटला… असे सांगून तीन किलोवॅटला एक हजार रुपये घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मी साईड इन्सेपेक्शन करतो..त्या मॅडमला काय ते हे करायसाठी शंभर दोनशे.. मी सांगतो तूला..पाच हजार रुपये दे त्याला अन एक हजार रुपये.. असे बोलून त्यांच्यासाठी रु.5000/- लाचेची मागणी करुन एईक्युसी मॅडमला रुपये 1000/- देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझे तीन प्रकरणे आहेत असे सांगितले असता त्यांनी तुम्ही तिन्हीचे मिळुन किती देणार हाय? अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना मला परवडेल सारख सांगा सर..पर प्रोजेक्ट थाऊजंटच्या हिशोबाने करूदे? असे विचारून लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी दहा किलोवॅटच जास्त हाय ना थोड.. पाच हजार रुपये करा तिन्हीचे मिळून..मी काय जास्त सांगत नाही तुम्हाला असे सांगून तिन्ही कामाचे मिळुन पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना म्हेत्रे सरांकडे पोहोच करू द्या का.. कस करू द्या सर.. असे बोलून लाच रक्कम कोणाकडे देवू असे विचारले असता, त्यांनी नाय असतील तर करुन टाका आता..मी सांगतो त्याला म्हणजे मला त्याला बोलायला बर राहिल की बाबा जाऊन बघुन ये.. त्यालाही पाचशे-हजार रुपये देऊ त्याला फक्त साईट दाखवून करुन घेवू उद्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना मी पैसे आणले नसले

बाबत सांगितले असता त्यांनी किती वेळात आणून देणार विचारले असता मी त्यांना एटीएम मधून काढून आणतो असे सांगून तिथून निघालो आणि 18.25 वा च्या सुमारास ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो.

त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी वरीलप्रमाणे झालेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईसरेकॉर्डर त्यांच्याकडील लॅपटॉपला जोडून त्यामधील संभाषण ऐकून त्याची खात्री केली. श्री व्हनमाने यांनी मला 10 ते 15 मिनिटेच ऑफिसमध्ये थांबणार असल्याचे सांगून लवकर पैसे घेवून येण्यास सांगिल्याने ते घरी निघून गेले असतील म्हणून म्हेत्रे यांच्याकडे त्यांच्या लाच रक्कमेबाबत व मॅडमच्या लाच रकमेबाबत खात्री करण्याच्या अनुषंगाने माझ्या मोबाईल क्र.9112222068 वरुन म्हेत्रे साहेब यांचा मोबाईल क्र. 9604289312 यावर 20.30 वाजता कॉल करुन मोबाईल स्पिकरवर ठेवून बोललो असता त्यांनी सोमवारी समक्ष बोलू असे सांगितले, त्यामुळे पोनि पिंगुवाले यांनी म्हेत्रे तसेच एईक्युसी मॅडम यांची पडताळणी सोमवारी करण्यात येणार असल्याचे सांगून गोपनीयतेबाबत मला

तसेच पंचांना सूचना देवून कारवाई स्थगित करून आजचा पंचनामा पुर्ण केला.

त्यानंतर सोमवार दि.19/05/2025 रोजी मी ला.प्र.वि कार्यालयात गेल्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाँईस रेकाँर्डर व दि.16/05/2025 रोजी पडताळणीसाठी वापरण्यात आलेला मेमरीकार्ड आमच्यासमक्ष काढुन व्हाँईस रेकाँर्डरमध्ये टाकून म्हेत्रे तसेच एईक्युसी मँडम यांची पडताळणी करण्यासाठी मला व पंच क्र.1 बनसोडे यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाँईस रेकाँर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून पंच क्र.1 यांच्यासह माझे सुझुकि कंपनीची एक्सेस माँडेलची मोटार सायकल क्र. एमएच 13 डीडब्यु 5121 यावरुन 12.00 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे कार्यालयात जावून म्हेत्रे यांची भेट घेतली त्यावेळी चर्चेदरम्यान त्यांनी ह्यांच एक तीन करा तीन असे म्हणुन म्हेत्रे यांनी मॅडम करीता 3000 रुपये मागणी केली, त्यावेळी मी त्यांना मँडम कुठले शिंदे मँडम का निशा मँडम अशी विचारणा केली असता त्यांनी इथ ह्या टेबलला सलगर मँडम असे सांगितले तसेच त्यांनी सलगर मँडम ट्रेनिंगला आहेत, भेटा वाटलस मँडमला असे सांगितले. त्यानंतर काहीवेळ चर्चा झाल्यावर मी त्यांना टोटल किती आणु दया सर असे विचारले असता, त्यांनी पाच अन तीन आठ आणा असे बोलून व्हनमाने साहेबांचे पाच हजार व सलगर मँडमचे तीन हजार रुपये असे एकूण आठ हजार रुपये लाचेची मागणी केली.

त्यावेळी मी त्यांना जगन्नाथ बी विंग हरीपदम रेसीडेन्सी अपार्टमेंट येथे विना अनुदानित 10 किलोवँट क्षमतेसाठी ग्राहक अर्ज क्र.330242008782 कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात सापडत नसल्याने शोधून ठेवण्यास सांगून ला.प्र.वि. कार्यालयात 12.49 वा.चे सुमारास परत आलो. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळ्यातील व्हाँईस रेकाँर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाँईस रेकाँर्डर त्यांच्याकडील लँपटाँपला जोडून त्यामधील संभाषण ऐकून तसेच पंच क्र.1 यांचेकडे लाच मागणी बाबतची विचारपुस करुन, पंच क्र.2 यांचे समक्ष खात्री केली. सदर पडताळणीदरम्यान सलगर मँडमची भेट झाली नसल्यामुळे त्यांची पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून पोनि पिंगुवाले यांनी मला सलगर मँडमची भेट घेण्याकरीता 17.08 वाजता रवाना केले. सदर वेळी मी कार्यालयात जावून म्हेत्रे व सलगर मँडम यांची भेट घेतली. त्यावेळी मी सलगर मॅडम यांना माझ्या कामाबाबत चर्चा केली असता त्यांनी ठिक आहे..माझ जे काय आहे ना पर के.डब्ल्यु. आपल एक - दिड हजारच ठरलेल हाय दहा किलो वँटच्या पुढे तीन हजार रुपये घेतो ते त्याज्याकड जमा करा..अन तुमच उद्याच्या उद्या दोन दिवसात द्यायला लावते. त्या कंझ्युमरच उद्या सगळ करुन घ्या उशिरापर्यंत थांबून उद्या दिला तर उद्या बाय हँन्ड घ्या त्यांच वन डे करून द्या म्हणजे ते ग्राहकपण खुष होईल असे सांगितले. त्यावेळी मी लाच रक्कम कोणाजवळ देवू असे विचारले असता त्यांनी हा म्हेत्रे साहेबांना करा..माझ विषय तुमच्याकडे घ्या आणि करून घ्या त्यांच असे म्हणुन लाच रक्कम म्हेत्रे यांचेकडे देण्यास सांगितले तसेच त्यांनी आहे का आता? आता देणार का? असे म्हणुन लाच रक्कम आणले का याची माझ्याकडे विचारणा केली असता, मी आता नाही असे सांगितल्यानंतर मग म्हेत्रेनं आल्यानंतर दे मला फक्त कन्फर्म कर किंवा मी उदया सकाळी येते माझ्याकडे दे असे सांगितले. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि कार्यालयात परत आलो ती वेळ 12.49 वाजताची होती. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळ्यातील व्हाँईस रेकाँर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील लँपटाँपला जोडून त्यामधील

संभाषण ऐकून तसेच पंच क्र.1 यांचेकडे लाच मागणी बाबतची विचारपुस करुन, पंच क्र.2 यांचे समक्ष खात्री केली.

सदर पडताळणी कारवाईदरम्यान श्री भारत व्हनमाने, अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांनी रुपये 5000/- लाचेची मागणी व स्वाती सलगर, सहायक अभियंता गुणवत्ता नियंत्रण(एईक्युसी) यांनी रुपये 3000/- लाचेची मागणी करुन अशी एकूण रु.8000/- लाच मागणी करून ती रक्कम योगीनाथ म्हेत्रे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि पिंगुवाले यांनी उदईक रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवून आजची कारवाई स्थगित केली.

त्यानंतर आज दि.20/05/2025 रोजी पाऊस येत असल्याने माझी ह्रुन्डई कंपनीची वेरणा कार क्र. एमएच 13 ईके 0037 यावरुन ला.प्र.वि कार्यालयात आलो, त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर व यापुर्वीच्या पडताळणीसाठी वापरण्यात आलेला सिलबंद मेमरीकार्ड आमच्यासमक्ष काढुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकून म्हेत्रे यांना कॉल करून भेटण्यासाठी येत असल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ते कार्यालयात थोडयावेळाने येणार असल्याचे सांगितले, त्यांनतर पोनि पिंगुवाले यांनी सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून प्रात्यक्षिक दाखवले, सदर वेळी मी हजर केलेले 8,000/- रू. रक्कमेच्या नोटांचे नंबर स्टाफकरवी एका कागदावर लिहुन त्यावर सह्या करुन तो कागद पोनि पिंगुवाले यांनी स्वत:जवळ ठेवला. त्यानंतर सदर नोंटांना अँथ्रासिन पावडर लावुन सापळापुर्व कारवाई पुर्ण करुन सदरच्या नोटा माझ्या जिन्स पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजूच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकावून माझी ह्रुन्डई कंपनीची वेरणा कार क्र.एमएच 13 ईके 0037 यावरुन 14.02 वाजता रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने येवून जुनी मिल येथील एमएसईबी कार्यालयाचे अलीकडे शासकीय वाहन थांबूवन पायी चालत कार्यालयाच्या मेनगेटजवळ कोणालाही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबून राहिले.

मी व पंच क्र.1 असे दोघे कार्यालयात जावून म्हेत्रे साहेबांची भेट घेतली असता, त्यावेळी म्हेत्रे यांनी आणले का तुम्ही असे बोलून लाच रक्कम आणले का याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी कामाबाबत चर्चा करून थोडया वेळाने मी आठ हजार आहेत असे बोलून पँन्टच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या खिशातून पैसे काढून म्हेत्रे यांच्याकडे दिले त्यावर म्हेत्रे यांनी सदर रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून ते त्यांच्या डाव्या हातामध्ये घेवून सदर लाच रक्कम त्यांच्या पँन्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेऊन घेतले. त्यानंतर मी त्यांना एकदा मॅडमना कल्पना देताय का किंवा सरांना असे सांगितले. त्यावेळी म्हेत्रे यांनी हा देतो की.. ते तेवढच त्यांच्यासमोरच बोललो की.. त्यांना माहित असतय ओ  असे बोलून मँडम बोलले होते की. दिल्यावर कॉल करा बोलले होते.. असे बोललो असता,  म्हेत्रे यांनी हा सांगतो मी.. तुम्ही बोललाव ना सरांचे पाच हजार मँडमचे तीन हजार अस म्हणलाव का कस म्हणलाव असे सांगितले. त्यानंतर मी सलगर मँडम यांना त्यांचे मोबाईल क्र. 8888445801 यावर कॉल करुन फोन स्पिकरवर ठेवून मॅडम नमस्कार ते म्हेत्रे सरांकड पोहोच केलय मँडम कालच बोललो असता त्यांनी हो चालेल मी बोलते म्हेत्रेशी असे सांगितले.

त्यानंतर ठरल्याप्रमाणे पंच क्र.1 बनसोडे यांनी पोनि/पिंगुवाले यांना कॉल करुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोनि पिंगुवाले यांनी म्हेत्रे यांना ताब्यात घेतले आणि पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. सदरची वेळ 14.31 वा ची होती. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी म्हेत्रे यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव योगीनाथ भैरप्पा म्हेत्रे, वय- 27 वर्षे, रा. मु.पो. हत्तूर, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर असे सांगितले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी त्यांचे पदाबाबत विचारणा केली असता ते सलगर मॅडम यांच्याकडे खाजगी स्वरुपात मदतनीस म्हणून काम करीत असल्याचे त्यांनी सांगीतले.

त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी म्हेत्रे यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवलेले लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली आणि सदर ठिकाणी पार्टीशन केलेल्या केबिनमध्ये कृत्रिम अंधार करुन श्री. म्हेत्रे यांच्या दोन्ही हात व पॅन्टची अल्ट्राव्हायोलेट दिव्याने तपासणी केली असता त्यावर अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म दिसून आले. सदर ठिकाणी सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. सदरवेळी अंगझडतीचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर सौ स्वाती सलगर ह्या त्याचक्षणी कार्यालयात आल्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पथकामध्ये उपस्थित महिला अंमलदाराकरवी त्यांना ताब्यात घेतले. त्यावेळी सौ स्वाती सलगर यांच्याकडे विचारपूस करून त्यांची महिला अंमलदाराकरवी झडती घेण्यात आली आणि सापळ्यातील प्राथमिक तपासण्याबाबत मोबाईलमधून व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. यादरम्यान श्री भारत व्हनमाने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचेबाबत कार्यालयातील प्रमुख अधिकारी मुख्य अभियंता श्री आशिष मेहता यांना पोनि पिंगुवाले यांनी विचारणा केली असता ते रजेवर असल्याचे माहिती मिळाली. सदर कारवाईबाबत पोनि पिंगुवाले यांनी त्यांना माहिती दिली. त्यानंतर योगीनाथ म्हेत्रे व सौ स्वाती सलगर यांना ताब्यात घेऊन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही ला.प्र.वि कार्यालयात पुर्ण करण्यात आले.

तरी दि.16/05/2025 रोजी 16.26 ते आज दि.20/05/2025 रोजी 14.31 वा चे दरम्यान आरोपी लोकसेवक 1) श्री भारत पांडूरंग व्हनमाने, वय- 45 वर्षे, पद- अतिरिक्त कार्यकारी अभियंता, वर्ग-1, नेम- महावितरण कार्यालय, ए- सबडिव्हिजन, सोलापूर रा. सध्या अंत्रोळीकर नगर भाग-1, प्लॉट नं.8, गणपती मंदिराचे पाठीमागे, सोलापूर मुळ रा. जुनोनी, ता. सांगोला, जि.सोलापूर, 2) सौ.स्वाती सदानंद सलगर, वय -40 वर्षे, पद- सहायक अभियंता, नेम- महावितरण कार्यालय, सोलापूर रा. बी-1, अभिषेक नगर, जुळे सोलापूर, सोलापूर यांनी माझ्या फर्मच्या वतीने 1) श्री हर्षवर्धन मोतीचंद शहा यांचे अनुदानित 3 किलोवॅट क्षमतेचे सोलार प्लॉन्ट 2) जगन्नाथ बी विंग हरीपदम रेसीडेन्सी अपार्टमेंट येथील विना अनुदानित 10 किलोवॅट क्षमतेचे सोलार प्लॉन्ट व 3) श्री विरल देसाई यांच्या दुकानाचे विनाअनुदानित 3 किलोवॅट क्षमतेचे सोलार प्लॉन्ट मंजूर करून मीटर बसविण्यासाठी आलोसे क्र.1 यांनी 5000/- रू व आलोसे क्र.2 यांनी 3000/- रू या प्रमाणे एकूण 8000/- रू लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम आरोपी 3) श्री योगीनाथ भैरप्पा म्हेत्रे, वय-27 वर्षे, खाजगी इसम रा. मु.पो हत्तूर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईवेळी आरोपी क्र.3 यांनी आरोपी क्र.1 व 2 यांच्यावतीने माझ्याकडून पंचासमक्ष 8000/- रू लाच रक्कम स्विकारले. अशाप्रकारे आलोसे क्र.1) भारत पांडूरंग व्हनमाने, 2) सौ. स्वाती सदानंद

सलगर यांनी सार्वजनिक कर्तव्य अनुचितपणे करण्याच्या उद्देशाने आरोपी क्र 3) योगीनाथ भैरप्पा म्हेत्रे यांच्याद्वारे गैरफायदा प्राप्त करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष पोनि गणेश पिंगुवाले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

तपास-- समक्ष पोनि गणेश पिंगुवाले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

ठाणे अंमलदार – पोह 1173 रूपनुर नेम फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापुर शहर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Arvind Khanderao Mane (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** Arvind Khanderao Mane

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से ं.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1980 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | महिला | 1985 | | - | | **चेचक:** क्र. |
| 3 | पुरुष | 1998 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व यंग वैशिष टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

| **Language/Dialect (भाषा/बोली)** | **Place of (चे ठिकाण)** | | | | | **Others (इतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark (भाजल्याचा खुणा)** | **Leucoderma (कोड)** | **Mole (तिळ)** | **Scar (व्रण)** | **Tattoo (गोदण)** | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**